# रे.दि.मु.नं.२०/२००२ मधील नि.९० वरील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादीने दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी दाखल केलेला आहे.

२) थोडक्यात वादीचे कथन असे की, वादीने सदरचा दावा जाहिर ठराव व निरंतरची ताकीद मागण्याकरीता केलेला आहे. यापुर्वी नि.५८ प्रमाणे दावा दुरुस्तीचा अर्ज दिला होता. तो मंजुर करण्यात आलेला आहे. परंतु वादी हा सज्ञान झाल्यामुळे अ.पा.क. हे शब्द काढुन वादीचे वय नमुद करण्याची गरज आहे. सदरची दुरुस्ती ही औपचारीक असुन त्यामुळे दाव्यात कोणताही बदल होणार नाही. तरी सदरचा अर्ज मंजुर करणेत यावा.

३) प्रस्तुत अर्जावर प्रतिवादीने त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यांनी वादीने सदर दाव्यात दुरुस्ती करण्यास उशीर केलेला आहे. सदरचा अर्ज देण्यास उशीर का झाला त्याबद्दलचे कोणतेही कारण नमुद केलेले नाही. तरी सदरचा अर्ज मंजुर करताना वादीवर खर्च लादण्यात यावा असे कथन केले.

४) प्रस्तुत अर्जावर वादी व प्रतिवादीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. दाव्याचे स्वरुप लक्षात घेता वादीने सदरहु अर्जात दुरुस्ती करण्यासाठी केलेली विनंती व मजकुर लक्षात घेता सदर अर्ज मंजुर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. सदरची दुरुस्ती ही आवश्यक असुन दाव्याच्या निर्णयासाठी योग्य आहे. परंतु सदर दुरुस्ती करण्यासाठी झालेला उशीर लक्षात घेता वादीवर योग्य तो खर्च लादणे उचित होणार आहे. तरी मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

**आदेश**

१) सदरचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) वादीने अर्जातील विनंतीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कालबद्धतेनुसार करावी व त्याप्रमाणे दुरुस्तीची प्रत त्वरीत दाखल करावी.

३) सदर दुरुस्ती अर्ज हा वादीवर रक्कम रुपये १,०००/— (रक्कम रुपये एक हजार फक्त) खर्च लादुन मंजुर करण्यात येतो. सदरचा खर्च वादीने प्रतिवादीस दयावा.

४) वादी व प्रतिवादी यांनी सदर आदेशाची नोंद घ्यावी.

(दि. ह. दाभाडे)

२४/०८/२०१५

दिवाणी न्यायाधीश, क. स्तर

वाई.